# तातडीचे


## राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१,२,५ व ६, हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई-४०० ००१

☎ ०२२-२२०५७४०९ / २२०७२०९७ E-mail : mah-sforum@nic.in
Website : https://grahak.maharashtra.gov.in/


जा.क्र.राआ/महा./आस्था-३/जि.मं./कामकाज/२०१५/३६२२ दिनांक १६ मे, २०१५

## -ः परिपत्रक ः-

मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र यांचे मान्यतेने दिनांक १८ मे, २०१५ ते ३० मे, २०१५ या कालावधीत राज्यातील जिल्हा मंचांद्वारे करावयाच्या कामकाजाबाबत या परिपत्रकाद्वारे खालील निर्देश काटेकोर अंमलबजावणीसाठी निर्गमित करण्यात येत आहेत ः-

१) वरील कालावधीत जिल्हा मंचासमोर प्रकरणे ठेवण्यात येऊ नयेत.

२) वरील कालावधीत जी प्रकरणे कन्फोनेट प्रणालीत अंतर्भूत करण्यात आलेली नाहीत, ती प्रकरणे सदरील प्रणालीत अंतर्भूत करण्याबाबत कार्यवाही करावी.

३) सुनावणीचे प्रकरणे कन्फोनेट प्रणालीत अद्ययावत करावीत- जसे पक्षकारांची नांवे अंतर्भूत करणे, जी नांवे दुरुस्ती / सुधारणा आदेशानुसार जोडण्यात वा बदलण्यात आलेली आहेत तसेच जे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यात आलेली आहेत, वकीलांचे नांव नव्याने जोडण्यात आलेली असल्यास, इ.

४) ग्राहक संरक्षण अधिनियम, २००५ च्या विनियम क्र.२० मधील तरतुदीनुसार जुने अभिलेख निर्लेखित करणे.

५) वरील कालावधीत जिल्हा मंचाचे मा.अध्यक्ष व मा.सदस्यांनी मंचात उपस्थित रहावे. काही प्रकरणे पुर्वीच ठेवण्यात आलेले असतील किंवा पक्षकार / वकीलांच्या विशेष विनंतीवरुन प्रकरणे मंचासमोर ठेवण्यात आलेली असल्यास त्या प्रकरणांची सुनावणी घ्यावी. अन्यथा प्रलंबित काम काढणेचे कामावर लक्ष द्यावे. कायद्याचा अभ्यास करावा व पुढे येणारी प्रकरणे वाचुन काढावीत.

आदेशान्वये,

ASW 16/05/15

(अ.सा.वैरागडे)
प्रबंधक विधी,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

**<u>प्रतिलिपी माहितीस्तव व कार्यवाहीस्तव</u>** ः-

१) मा.न्यायिक सदस्य व मा.सदस्य, राज्य आयोग, महाराष्ट्र

२) मा.अध्यक्ष, सर्व जिल्हा ग्राहक मंच, महाराष्ट्र राज्य

३) मा.सदस्य, सर्व जिल्हा ग्राहक मंच, महाराष्ट्र राज्य

४) प्रबंधक विधी, राज्य आयोग, महाराष्ट्र, नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ

५) प्रबंधक, सर्व जिल्हा ग्राहक मंच, महाराष्ट्र राज्य

६) अधिक्षक आस्था व जन संपर्क अधिकारी, राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

(अ.सा.वैरागडे)
प्रबंधक विधी,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

*टीप ः हे परिपत्रक राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्रच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.*

D:\SC MAH\DISTRCIT FORUM\DF work.doc